# गोकर्ण गणेश मंदिरात सामुदायिक अथर्वशीर्ष पठण

**कोपरगाव (प्रतिनिधी)–** शहरातील कापड बाजार परिसरात गणपत चावडी येथील ग्रामदैवत गोकर्ण गणेश मंदिरात गणेश सार्वजनिक उत्सव निमित्ताने संस्कृत विषयाची अभिवृद्धी अभियान अंतर्गत डॉ. सी. एम. मेहता विद्यालयातील विद्यार्थिनींनी सामुदायिक अथर्वशीर्ष पठण केले.



गणपती अथर्वशीर्ष पठण केल्याने बुद्धीला स्थिरता येते, मनाला शांती मिळते, वाईट गोष्टी दूर होतात आणि व्यक्ती निरोगी, श्रीमंत आणि समृद्ध बनतो. बोलताना उच्चार सुधारतात. हे एक अत्यंत प्रभावी उपनिषद मानले जाते, जे गणपतीला बुद्धी आणि विद्यांचे प्रतीक मानून गणेश उपासकांमध्ये विशेष महत्त्वाचे आहे.

अथर्वशीर्ष पठणानंतर श्लोक घेण्यात आले. ग्रामदैवत गोकर्ण गणेश देवस्थानचे अध्यक्ष सुरेश महाजन, उपाध्यक्ष सुभाष महाजन, सूर्यतेज संस्थापक सुशांत घोडके, पौरोहित्य प्रदिपशास्त्री पदे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्राचार्या अनिता धनक, उपप्राचार्या उज्वला म्हस्के, सुपरवायझर सुनिता पवार, प्रभाकर आभाळे, संस्कृतचे दिगंबर काळे, अंजली मुंढे यांचे सहकार्य लाभले.

# नेवाशातील घाटावर विविध मंडळांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन

**नेवासा (शहर प्रतिनिधी)–** नेवासा येथील प्रवरानदी तीरावर असलेल्या गणपती घाटावरील मानाच्या गणपतीची पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते आरती करण्यात आली. मानाच्या गणपतीचे सदस्य राजेंद्र मापारी यांचे निधन झाल्याने दुखवटा व्यक्त करत मिरवणुकीत सहभाग न घेता प्रवरा नदीपात्रात विसर्जन करण्यात आले.




पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते मानाच्या गणपतीचे पूजन करण्यात आले. यावेळी मंडलाधिकारी अनिल गव्हाणे, कामगार तलाठी धनंजय परदेशी, उपनिरीक्षक अमोल पवार, सहायक फौजदार भास्कर दरंदले, पोलीस उपनिरीक्षक गणेश लोंढे, शाम देशपांडे, संतोष कुंढारे, श्रीपाद बडवे, सुरेश नळकांडे, प्रदीप सराफ, ऋषिकेश जोशी, अरुण जोशी, शंकरराव अंबिलवादे, स्वानंद बडवे, राहुल सोनार, विनायक अंबिलवादे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गणपती घाटावर अनेक मंडळांनी मिरवणूक न काढता गणपतीचे विसर्जन केले. घराघरातून अनेक कुटुंबातील सदस्यांनी येथे गणपती आणून गणपतीची एकत्रितपणे आरती करून विसर्जन केले. नगरपंचायतच्या वतीने निर्माल्य एकत्रित करण्यासाठी विशेष कक्ष उभारण्यात आला होता. गणपती विसर्जन सुरक्षित होण्यासाठी हरिभाऊ पडूंरे यांच्या प्रवरा नदीवरील बोटीतून व्यवस्था करण्यात आली होती. याठिकाणी होमगार्ड व पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

यावेळी निघालेल्या गणपती विसर्जन मिरवणूकीत शहरातील श्री मोहिनीराज गणेश मंडळ, त्रिमुर्ती गणेश मंडळ, शिव एकता गणेश मंडळ, जयदुर्गा गणेश मंडळ, बजरंग ग्रुप, मित्र परिवार गणेश मंडळ, नवनाथ तरुण मंडळ, जगदंबा गणेश मंडळ, जय हिंद गणेश मंडळ सहभागी झाले होते.

# देशाची जातीव्यवस्था राष्ट्रीय कर्करोग असल्याचा आरोप; राष्ट्रीय संकल्प घेण्याचे आवाहन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** भारतामधील जातिव्यवस्था ही केवळ सामाजिक अन्याय नसून राष्ट्रीय दुर्बलतेचे मुळ आहे. न्याय व समानतेशिवाय खरी लोकशाही कधीही टिकू शकत नाही, असा ठाम संदेश पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने देण्यात आला आहे. जातिनाशासाठी आता विचार नव्हे तर कृतीची गरज असून, यासाठी विज्ञानाधारित एकात्म ज्ञानतत्त्व (आयकेटी) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या दोन शस्त्रांचा संगमच युगधर्म असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

हजारो वर्षांपासून एका जातीमध्येच विवाह करण्याची सक्ती ही केवळ सामाजिक गुलामी नव्हती, तर जैविक आत्महत्या होती. त्यामुळे जीन्स पूल संकुचित झाला, रोगप्रतिकारशक्ती कमी झाली, मेंदूची सर्जनशीलता दबली, तरुणाईचे धैर्य कोमेजले. या मानसिक दुर्बलतेमुळेच परकीय आक्रमकांना गुलामगिरीसाठी निमंत्रण मिळाले. त्यामुळे मजबूत, मुक्त आणि बलशाली राष्ट्र निर्माण करायचे असेल तर आंतरजातीय विवाह आणि मुक्त जीन्स पूल हा राष्ट्रीय संकल्प असण्याचा संदेश पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने देण्यात आला आहे. धर्मग्रंथ व परंपरेतील ज्ञानात काही उपयुक्त तुकडे असले तरी जातिवर्चस्व, स्त्रीदमन आणि अंधश्रद्धा हा त्यातील सडका भाग आहे. म्हणजे असा आरसा जो प्रत्येक तुकड्याचे परीक्षण करतो.

वैज्ञानिक आणि मानवतावादी गोष्टी स्वीकारतो. अवैज्ञानिक, अमानवी गोष्टी नष्ट करतो. ही प्रक्रिया म्हणजेच जातीच्या स्मृतीतील नॉन-जेनेटिक विषारी माहिती विसर्जित करून नवे समाजमन घडवण्याची चळवळ असल्याचे कारभारी गवळी यांनी म्हटले आहे.

# पावसावरच अवलंबून राहणार रब्बीच्या १० लाख हेक्टरचे नियोजन

## कृषी विभागाकडून तयारी; दक्षिणेत ज्वारी तर उत्तरेत गहू-हरभराचे क्षेत्र

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** यंदा मान्सूनपूर्व पावसाच्या तडाख्यानंतर जिल्ह्यात पावसाने अनेक भागात पाठ फिरवलेली आहे. अद्याप परतीचा पाऊस होणे बाकी असून या पावसावर जिल्ह्यात रब्बी हंगामाची भिस्त राहणार आहे. दरम्यान, जिल्ह्यात कृषी विभागाकडून १० लाख हेक्टरवर रब्बी हंगामातील पिकांच्या पेरण्याचे नियोजन करण्यात आले असले पाऊस लांबल्यास रब्बीच्या पेरण्या देखील लांबण्याची शक्यता आहे.

दरम्यान, जिल्ह्यात गोकुळअष्टमीपासून अनेक ठिकाणी ज्वारीच्या पेरण्यांना सुरूवात होते. दरवर्षी जिल्ह्यात दक्षिण भागात ज्वारीचे क्षेत्र असते, तर उत्तर भागात गहू आणि हरभरा पिकांना शेतकरी प्राधान्य देत असतात. मात्र, परतीच्या पावसावरच जिल्ह्यातील रब्बी हंगामातील पिकांची भिस्त असल्याचे आजपर्यंत चित्र आहे. यंदा जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असले तरी मूळा, भंडारदरा, निळवंडे यासह दक्षिणेतील सर्व मध्यम प्रकल्प, पुणे जिल्ह्यातील घोड व कुकडी धरण समुह तर नेवासा, शेवगाव आणि काही प्रमाणात पाथर्डी तालुक्यासाठी जायकवाडी धरणाचा फायदा होणार आहे. यामुळे यंदा जिल्ह्यात गहू आणि हरभरा पिकाचे क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात २०२२-२३ मध्ये रब्बी हंगामात ७ लाख ९८ हजार हेक्टर, २०२३-२४ मध्ये ८ लाख ५ हजार, २०२४-२५ मध्ये ९ लाख ३१ हजार हेक्टरवर पेरण्या झाल्या होत्या. यंदा हे क्षेत्र १० लाख २५ हजार प्रस्तावित करण्यात आले आहे.

**तालुकानिहाय क्षेत्र**

नगर ९० हजार, अकोले ३० हजार ५६४, जामखेड ७२ हजार ४६८, कर्जत १ लाख १३ हजार ५७२, कोपरगाव ४९ हजार ७१८, नेवासा ९२ हजार ३६३, पारनेर १ लाख २० हजार, पाथर्डी ६५ हजार ५४०, राहाता ५३ हजार १८३, राहुरी ५० हजार ८७०, संगमनेर ६७ हजार ९३२, शेवगाव ४८ हजार १३७, श्रीगोंदा १ लाख १० हजार १८२, श्रीरामपूर ३७ हजार ६०९ हेक्टर क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले आहे.

**२ लाख ८३ हजार मेट्रीक टन**

**खतांचे नियोजन**

रब्बी हंगामासाठी जिल्ह्यात २ लाख ८३ हजार मेट्रीक टन खातांचे नियोजन करण्यात आले आहे. यात ऑक्टोंबर महिन्यात ६७ हजार ३७१, नाव्हेंबर महिन्यांत ५८ हजार ७५०, डिसेंबर महिन्यांत ६१ हजार ९७४, जानेवारी महिन्यांत ५३ हजार ३३६, फेब्रुवारी महिन्यांत २९ हजार ८२२ आणि मार्च महिन्यांत ११ हजार ८८१ मेट्रीक टन खतांचा पुरवठा होणार असल्याचे कृषी विभागाच्या सुत्रांकडून सांगण्यात आले.

# श्रीरामपुरात श्री साई गारमेन्टस मॅन्युफॅक्चरर व होलसेलरचा शुभारंभ संपन्न

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** येथील बेलापूर रोड वरील रामगड येथे श्री साई गारमेन्टस् मॅन्युफॅक्चरर आणि होलसेलर या वस्त्रदालनाचा शुभारंभ नुकताच मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाला.



येथील महापूरे बंधू यांनी जेन्टस् रेडिमेडच्या १६ शाखांना ग्राहकांच्या मिळालेल्या प्रचंड प्रतिसादानंतर येथील बेलापूर रोडवर रामगड येथे श्री साई ग्रारमेंन्ट्स मॅन्युफॅक्चरर व होलसेलर हे भव्य दालन ग्राहकांसाठी खुले केले असून येथे व्यावसायिकांना होलसेल दरात शर्टस् जिन्स, टि-शर्ट, नाईट पॅन्ट तसेच लहान मुलांचेही रेडिमेड ड्रेसेस् माफक दरात मिळणार आहे.

हा शुभारंभ रिलस्टार भैय्या गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थित सोमनाथ महापुरे, शिवनाथ महापुरे, संतोष महापुरे यांच्या हस्ते व अभिषेक खंडागळे, रविंद्र खटोड, अशोक गवते, भरत साळूंके, शशिकांत साळुंके, अशोक रावत, सचिन थोरात, निलेश थोरात, कमलाकर साबने, सुधाकर साबने, राजू साबने, प्रभाकर साबने, पद्ममाकर तावडे, कैलास तावडे, हितेश मकवाना, रामदास गायकवाड, संतोष जाधव, लहानू नागले, विलास नागले, सतिश वाघ, श्री. राऊत, गणेश मगर, अनंत सागजकर, मनोज विखणकर, अतुल थावरे, शांतीलाल आंबेकर, म्हस्के बंधू, किशोर ग्यानचंदानी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

श्री साई गारमेन्टस् यांच्या श्रीरामपूर येथे तीन शाखा, राहुरी येथे तीन शाखा, राहाता, नगर व लासलगाव येथे प्रत्येकी दोन शाखा तसेच शिक्रापूर, पुणे, रांजणगाव, चांदवड, मनमाड येथे प्रत्येकी एक शाखा अशा एकूण १६ शाखा चालू असून त्यांना ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. श्री साई गारमेन्ट्स मॅन्युफॅक्चरर व होलसेलर मुळे ग्राहकांना तसेच व्यवसायिकांनाही चांगला फायदा होणार आहे. यावेळी आदित्य महापुरे, अभिषेक महापुरे, प्रणव महापुरे, जयेश महापूरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# गौरी गणपती सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण

## सौ. मुळे प्रथम, सौ. बोऱ्हाडे द्वितीय तर सौ. बचाटेंना तृतीय क्रमांक

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर येथील वॉर्ड नंबर ७ येथील रवींद्र जाधव मित्र मंडळ व शिवसेना संपर्क कार्यालय यांच्यावतीने गणेशोत्सव निमित्ताने महिलांसाठी भव्य गौरी गणपती सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सुमारे ३५० महिलांनी सहभाग नोंदविले तसेच विविध प्रकारे संदेश देणारे देखावे सादर केले. प्रथम बक्षीस पाच हजार विजेत्या सौ. अश्विनी मुळे ठरल्या तर द्वितीय बक्षीस (तीन हजार एक) मनीषा बोऱ्हाडे या द्वितीय व (दोन हजार एक व सन्मानचिन्ह)शीतल बचाटे तृतीय विजेत्या ठरल्या. तसेच यामध्ये सहभाग घेणाऱ्या सर्व महिलांना साडी, ताट, हळदी कुंकू करंडा व गौरव चिन्ह देऊन



सन्मानित करण्यात आले. या उपक्रमामुळे आम्हाला प्रेरणा मिळाल्याची भावना स्पर्धेतील महिलांनी व्यक्त केली. अशा उपक्रमांमुळे जनतेमध्ये एकोपा, प्रेम व धर्मा बद्दल आस्था वाढते, असेही सांगण्यास त्या विसरल्या नाहीत.

या कार्यक्रमासाठी माजी खासदार सदाशिव लोखंडे, माजी आ. भानुदास मुरकुटे, माजी आ. भाऊसाहेब कांबळे, राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन औताडे, तालुका प्रमुख प्रदीप वाघ, उपजिल्हाप्रमुख राजेश तांबे, बांधकाम कामगार सेनेचे विशाल शिरसाठ, माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे, आकाश बेग, राष्ट्रीय श्रीराम संघाचे संपर्कप्रमुख सागर शेटे, देविदास सोनवणे, सुनिल शेळके, अशोक तुपे, उपतालुका प्रमुख लक्ष्मण पाचपिंड, डॉ. राहुल नाणेकर, संजय साळवे, पंकज कणगरे, मनोज पवार, शिवाजी कोते, मोरे, प्रशांत पोटे, कृष्णा जाधव, किशोर वाडीले, महिला आघाडी शहर प्रमुख सविता वाडीले, रेश्मा जाधव, प्रतिमा मोरे, सारिका कणगरे, ज्योत्स्ना कांडेकर, आरती करमास,हहहहहहहह माधुरी पोटे, राणी मेहत्रे, निर्मलाताई शेळके, सुजाता शेटे तसेच मोठ्या संख्येने शिवसेना पदाधिकारी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील होते. सूत्रसंचालन समाजसेवक समीर माळवे यांनी केले तर आभार प्रकाश मेहत्रे यांनी मानले.



**डॉ. सदावर्ते हॉस्पिटलच्या १० व्या वर्धापनदिनानिमित डॉ. निलेश सदावर्ते यांना शुभेच्छा देताना मुख्याध्यापक हरिश्चंद्र सोनवणे, प्रा. राजन वधवाणी व दिनेश तरटे.**

# राजेंद्र मापारी यांचे निधन

**नेवासा (शहर प्रतिनिधी)–** येथील श्री मोहिनीराज यात्रा उत्सव कमेटीचे अध्यक्ष राजेंद्र वसंतराव मापारी (वय ५५) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. येथील अमरधाममध्ये शनिवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात वडील, भाऊ, बहीण, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. स्वप्नील मापारी व अ‍ॅड. अनिकेत मापारी यांचे ते वडील तर व्यापारी प्रविण मापारी यांचे बंधू होत. नेवासा शहरात होणाऱ्या विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमात त्यांचा मोलाचा सहभाग असायचा. तंटे मिटवणे, नेवासा शहरात सण उत्सवाच्या काळात अग्रभागी राहून ते उत्सव एकोप्याने साजरे करण्यासाठी ते प्रयत्न करत असत. त्यांच्या अंत्यसंस्कारप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## पान १ वरुन

### मराठा समाजाकडून कॅव्हेट दाखल

न्यायालयात काही जणांकडून जीआर विरोधात याचिका दाखल केल्याची काळकुटे यांनी माहिती दिली आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा तिढा सोडवला मात्र काही जणांकडून याला विरोध केला जात आहे. त्यामुळं हे कॅव्हेट असल्याची माहिती आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली मुंबईच्या आझाद मैदानात पाच दिवस आमरण उपोषण सुरु होते. पाच दिवसानंतर हे आंदोलनाचा अखेर मंगळवारी थांबल आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या बहुतांश मागण्या मान्य झाल्या असून जरांगे यांनी केलेल्या प्रमुख आठ मागण्यापैकी सहा मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. त्यातील तातडीने अंमलात येणाऱ्या हैदराबाद गॅझेटिअरसंबंधी जीआर देखील काढला आहे. दरम्यान या शाशन निर्णयावर ओबीसी समाजाच्या काही नेत्यांनी नाराजी व्यक्त करत आक्रमक भूमिका घेतली आहे. या निर्णयाविरोधात न्यायालयात जाणार असल्याची भूमिका ओबीसी नेत्यांनी मांडली आहे.

### पैलवान तेल लावून तयार...

आणि जामखेड तालुक्यात प्रत्येकी एक गट आणि पंचायत समितीचे दोन गण वाढलेले आहेत.

नव्याने होणाऱ्या आरक्षण सोडतीत गट व गणातील लोकसंख्येच्या उतरत्याक्रमाने आरक्षण निघेल. यामुळे चक्रिय आरक्षणाची अडचण दूर होणार असून ग्रामीण नेतृत्वाला संधी देण्यासाठी हा निर्णय पोषक ठरणार आहे. यंदा निघणारे आरक्षण हे त्या जिल्हा परिषद गटाच्या लोकसंख्येवर आधारित असणारे पहिले आरक्षण असणार आहे. यामुळे जिल्हा परिषद गट आणि पंचायत समितीच्या गणात तुल्यबळ लढती रंगतील. शासनाच्या राजपत्रात आरक्षण नियमाला महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पद्धत) नियम २०२५ असे नाव देण्यात आले आहे. नव्याने आरक्षण निश्चित केली जाणार असल्याने इच्छुकांच्या नजरा आरक्षणाकडे लागल्या आहेत.

### गोदावरी पुन्हा दुथडी...

झाला होता. या जलाशयात ९९.३४ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे या धरणातून ३७७२८ क्युसेकने विसर्ग करण्यात येत होता. यासाठी या धरणाचे १० ते २७ क्रमांकाचे नदी गेट २ फुट उंची पर्यंत उचलण्यात आले आहेत. त्यातून हा विसर्ग धरणाच्या खाली गोदावरीत सोडला जात आहे. त्यामुळे पैठण भागात गोदाकाठावर सतर्कतेचा इशारा प्रशासनाने दिला आहे. या धरणात काल सायंकाळी ६ वाजता मागील ३ तासांत सरासरी ४७ हजार ८१६ क्युसेक पाण्याची आवक झाली.

### भारताच्या दोस्ताने कॅन्सरवर...

आहे. एफएमबीडीच्या प्रमुख वेरोनिका स्कवोर्सोवा म्हणाल्या की, या एमआरएनए- आधारित लशीने तिची सुरक्षितता आणि परिणामकारकता सिद्ध करणाऱ्या सर्व प्रीक्लिनिकल चाचण्या यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्या आहेत.

### खग्रास चंद्रग्रहणाचा जिल्हाकरांनी...

ग्रहणकाळ अनेकांनी पाळला. या काळात मंदिरे दर्शनासाठी बंद करण्यात आले होते. चंद्रग्रहण काळात अनेकांनी मंत्र पठन केले. काहींनी प्रार्थना केली.

### जीएसटी कमी झाल्यानं...

झाल्याने या गाड्या पुन्हा एकदा खरेदीदारांच्या बजेटमध्ये आल्या आहेत. त्यामुळे डीलर्सना आता गाड्यांच्या जास्तीच्या किंमती ठेवणे कठीण होणार आहे.

या जीएसटी दरकपातीमुळे कारच्या किमतींमध्ये मोठ्या प्रमाणात घट होणार असल्याने डीलर्सना कमी नफ्यावर किंवा कधीकधी खरेदीपेक्षा कमी दरातही गाड्या विकाव्या लागतील. इतकंच नाही तर ज्या व्यक्तींना स्वतःची जुनी गाडी विकायची आहे, त्यांनाही याचा तोटा सोसावा लागणार आहे. कारण त्यांना त्यांच्या वाहनासाठी अपेक्षित किंमत मिळणार नाही. म्हणजेच, एकूण पाहता जीएसटी दरकपातीचा फायदा नवीन कार खरेदीदारांना मिळत असला तरी सेकंड हँड कार बाजारात मोठा गोंधळ आणि तोटा निर्माण झालेला आहे.

# अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत हडपली शेतजमीन

**पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील हत्राळ येथील एका शेतकऱ्याला दारू पाजून व अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत धमकी देत फसवणूक करून दोन एकर (८० गुंठे) शेतजमीन हडपल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी राजयोग हॉटेलचा मालक कालिदास दत्तात्रय टकले (वय ३०, रा. हत्राळ) याच्याविरुद्ध शेतकऱ्याने पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर करीत आहेत.

फिर्यादीत म्हटले आहे की, दि. २७ मे रोजी सकाळी तक्रारदार आपल्या मोटारसायकलने शेवगाव-तिसगाव रोडवरील राजयोग हॉटेलमध्ये गेले असता हॉटेलचा मालक कालिदास टकले याने त्यांना दारू पाजली. त्यानंतर भाजीपाला आणण्याच्या बहाण्याने त्यांना तिसगावला नेले. परत आल्यानंतर दारूच्या नशेत असलेल्या तक्रारदार यांना हॉटेलमध्ये झोपवून टकले याने त्यांचा एका महिलेसोबत अश्लील व्हिडीओ बनविल्याचे सांगत तो व्हिडीओ गावात व्हायरल करण्याची धमकी दिली.

यानंतर टकले याने तक्रारदार यांना दुय्यम निबंधक कार्यालय, पाथर्डी येथे नेऊन काही कागदपत्रांवर सही करून घेतली. त्या वेळी तक्रारदार पूर्णपणे दारूच्या नशेत होते. यावेळी तेथे संदिप साळवे (रा. चितळी, ता. पाथर्डी) आणि एक अनोळखी इसम उपस्थित होते.

काही दिवसांनंतर, दि. ४ जून रोजी तक्रारदार यांचा लहान भाऊ (सध्या सैन्य दलात कार्यरत) याने फोनवरून सांगितले की, ई-चावडी संकेतस्थळावर त्यांची ८० गुंठे शेतजमीन (गट क्र. २२३/१, शिवार हत्राळ) विक्रीखताद्वारे कालिदास टकले यांच्या नावावर झाल्याची नोंद दिसत आहे. त्यानंतर तक्रारदार यांनी चौकशी केली असता खरेदी दस्त क्रमांक २१२३/२०२५ प्रमाणे जमीन टकले यांच्या नावे झाल्याचे आढळले.यानंतर त्यांनी मंडळ अधिकारी कार्यालयात हरकत अर्ज दाखल केला. दि. १७ जुलै २०२५ रोजी मंडळ अधिकाऱ्यांनी तक्रारदार यांची बाजू ग्राह्य धरून, टकले याने धमकी देऊन व फसवणूक करून जमीन खरेदी केल्याचे मान्य करून नोंदणी नामंजूर केली. जमीन विक्रीप्रसंगी कोणताही मोबदला तक्रारदार यांना दिला नसल्याचेही उघड झाले.या संपूर्ण प्रकरणात दारू पाजून, अश्लील व्हिडीओची धमकी देऊन व फसवणूक करून जमीन हडपल्याचा आरोप टकले यांच्यावर करण्यात आला आहे. तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.